# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O) 2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103, Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम/माध्य./ 2499

दिनांक - २४/०१/२०२१

प्रति,

मुख्याध्यापक,

सर्व माध्यमिक शाळा,

सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय :- माध्यमिक शालान्त (इ.१०वी) प्र.परीक्षेसाठी शालेय वैकल्पिक श्रेणी विषयाबाबत..**

**संदर्भ :-** १. कोल्हापूर जिल्हा कलाध्यापक संघ, कोल्हापूर यांचे जा.क्र.११६ दि.१८/०१/२०२२ चे पत्र

२.राज्यमंडळाचे क्रराम/संशोधन,पापुअ-ई/१०२९ दि.०१/०३/२०२१ चे तसेच या विभागीय मंडळाने शाळांना अग्रेषित केलेले जाक्र.कोविमं/शाखा माध्य.परीक्षा/७२२० दि.०१/०३/२०२१ चे पत्र

३. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांचे जाक्र.राशैसंप्रपम/अविवि/विषय योजना/२०२०-२१/१८८८ दि.०७/१०/२०२० चे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, यापुर्वी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी श्रेणी विषयामध्ये स्वविकास व कलारसस्वाद (R७) हा अनिवार्य विषय होता. सदर विषयाऐवजी सन २०२१-२२ पासून जलसुरक्षा (R८) हा विषय अनिवार्य करण्यात आलेला आहे.

आरोग्य व शारिरीक शिक्षण (P१) हा विषय वैकल्पिक विषयामध्ये पुर्वीप्रमाणे अनिवार्य असेल तसेच शालेय वैकल्पिक गट स्काऊट व गाईडिंग (P२), राष्ट्रीय छात्रसेना/सागरी छात्रसेना (P३), संरक्षणशास्त्र (P४), नागरी संरक्षण व रस्ता सुरक्षा (P५), समाजसेवा (P६) हे विषय पुर्वीप्रमाणेच कायम राहतील याची नोंद घ्यावी.

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. २ नुसार श्रेणी विषयातील वैकल्पिक गटात संरक्षणशास्त्र या विषयाला सद्यस्थितीत एम.सी.सी.(इ.९वी साठी), स्काऊट गाईड, नागरी संरक्षण, व वाहतुक सुरक्षा, एन.सी.सी. हे विषय सुरु आहेत. कार्यशिक्षण , समाजसेवा व व्होकेशनल V१,V२,V३ इ. व्यवसाय विषयांचे पर्याय शालेय वर्ष २०२०-२१ पासून इ.९वी सुरु केले आहे हे आपणास ज्ञात आहेच व शालेय वर्ष २०२१-२२ पासून इ.१०वी साठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. या कार्यशिक्षण विषयांचे नाव व सांकेतिक कोड पुढीलप्रमाणे आहेत.

| अक्र | सांकेतांक | विषयाचे नाव |
|---|---|---|
| १ | जे १ | घरगुती विद्युत उपकरणे |
| २ | जे ५ | दूध व दूधाचे पदार्थ |
| ३ | जे ९ | हस्तभरतकाम |
| ४ | के १ | शिवणयंत्राव्दारे शिलाई व शिवणयंत्राची निगा व दुरुस्ती |
| ५ | के ५ | टाकाऊ वस्तुपासून सौदर्याकृती |
| ६ | एल ७ | पाककला |
| ७ | एम ३ | भारतीय संगीत (गायन-वादन) |
| ८ | एम ६ | चित्रकला व रंगकाम |
| ९ | एम ७ | कागदकाम, पुठ्ठाकाम व पुस्तकबांधणी |

**मात्र ज्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी शालेय क्रमिक विषयांसाठी वरील 1 ते 9 विषय घेतले असल्यास सदर विद्यार्थ्यांस तो विषय श्रेणी विषयामध्ये घेता येणार नाही याची नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी जेणेकरुन विषययोजना चुकीची होणार नाही याची दक्षता घ्यावी.**

तसेच उपरोक्त राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र संदर्भीय पत्र क्र.3 नुसार स्वविकास व कलारसस्वाद (R7) हा विषय संरक्षणशास्त्र सोबत वैकल्पिक गटात समावेश केला असल्यामुळे सदरचा विषय वैकल्पिक श्रेणी विषयास घेता येईल याची नोंद घ्यावी.

(सत्यवान सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत -

१. सचिव/कार्याध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा कलाध्यापक संघ, कोल्हापूर
२. शिक्षणाधिकारी, सातारा/सांगली/कोल्हापूर
३. शिक्षण उपसंचालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर